मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करणे.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक- वशिअ- ११२०/प्र.क्र.२७/११**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- २३ ऑक्टोबर, २०२०

वाचा:- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:वशिअ- १२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक २ जून, २०१४

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: वशिअ- १२१४/ प्र.क्र.५१(२)/११, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४

## शासन परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ च्या नियम १९ पोटनियम (१) व त्याखालील टिप ३ अनूसार प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांने (गट 'ड' मधील कर्मचारी वगळता) कोणत्याही सेवेतील/ पदावरील आपल्या प्रथम नियुक्तीच्या वेळी व त्यानंतर शासन विहीत करेल त्या-त्या वेळी विहीत नमुन्यामध्ये आपले मत्ता व दायित्व या बाबतचे विवरण सादर करणे बंधनकारक आहे.

२. प्रत्येक राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांने (गट 'ड' मधील कर्मचारी वगळता) त्याच्या प्रथम सेवा प्रवेशाच्या वेळी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत व त्या नंतर दरवर्षाच्या दिनांक **३१ मार्च रोजीच्या स्थितीस अनुसरून त्यांची मत्ता व दायित्वाची विवरणे त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत विहित प्राधिकरणास सादर करावयाची आहेत**. त्या-त्या वर्षाची वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही राज्य शासना मधील सर्व टप्प्यावरील पदोन्नती, आश्वासित योजने अंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा यासाठी पूर्व अट म्हणून विहीत करण्यात आली आहे. या अनुषंगाने मत्ता व दायित्व विवरणपत्रे सादर करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. तथापि अद्यापही अशी विवरणपत्रे वेळेत सादर न झाल्याने पदोन्नतीस विलंब होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

३. तरी सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी (गट 'ड' मधील कर्मचारी वगळता) हे मत्ता व दायित्वाची वार्षिक विवरणे विहीत मुदतीत सादर करतील याची दक्षता सर्व प्रशासकीय विभागांनी काटेकोरपणे घ्यावी.

४. सदर सूचना सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागांनी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२०१०२३१२३५०९२७०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gupte Sanju Kamlakar

Digitally signed by Gupte Sanju Kamlakar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2834863d93dd5ba34736e8845b6287c3dd58ee176cf2b893df4e169e70699c59, serialNumber=4c10e808fe85223e03be4cad0148cef9a71914878680c586fc438e7239dafca4, cn=Gupte Sanju Kamlakar
Date: 2020.10.23 14:54:02 +05'30'

**( संजू क. गुप्ते )**
**अवर सचिव**
**सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) उपमुख्यमंत्री यांचे सचिव

४) अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
५) सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
६) उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
७) उप सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
८) विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा
९) विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद
१०) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
१३) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१४) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१५) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१६) *सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
१७) *सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
१८) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९) *आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
२०) सर्व मंत्रालयीन विभाग,

मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय संस्था, पंचायतराज संस्था, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती, सांविधिक संस्था, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, मंडळे यांच्या निदर्शनास वरील आदेश आणावेत.

२१) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२३) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२४) सर्व विधीमंडळ सदस्य,
२५) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६) निवडनस्ती.

*पत्राने